**सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पर्यटन विकासाबरोबर पर्यावरणाच्या योग्य तो समतोल व संरक्षण साधून ऊर्जा व खाणकाम प्रकल्पांना परवानगी देण्याबाबत -**

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग, मंत्रालय
कमांक : सिंउखा-२००८/उऊ वक ॥/प्र.क. १५७/तां.क. १,
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २ जानेवारी, २००९.

वाचा : शासन निर्णय, क्रमांक एमटीसी-१०९७/प्र. क्र. ८५२/पर्यटन, दिनांक २६ ऑगस्ट, १९९७.

प्रस्तावना : "सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीकोनातून हा जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून शासनाने घोषित केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकासाबरोबरच जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने नियोजन करणे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय**

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशपूर्तीबरोबरच राज्याची ऊर्जा निर्मितीची निकड तसेच उपलब्ध समृध्द खनिजाचा साठा लक्षात घेता, या ठिकाणी पर्यावरण संरक्षणासाठी सर्वंकष निकष लागू करुन खाली नमूद केलेल्या प्रकल्पांना अनुमती देण्यात येईल :-

(१) वीज निर्मिती प्रकल्पांना प्रदूषण नियंत्रणाबाबत कडक अटी घालून परवानगी देण्यात येईल. मात्र, सदर उद्योगांनी फ्लु गॅस डिसल्फरायझेशन यंत्रणा बसविणे आवश्यक राहील. तसेच फ्लाय ॲश अधिसूचनेच्या तरतुदीनुसार ॲश वापराबाबतचा कार्यक्रम पूर्वनियोजित असावा.

(२) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर आधारीत प्रकल्प.

(३) खाणकाम प्रकल्पांना प्रदूषण नियंत्रणाबाबत कडक अटी घालून परवानगी देण्यात येईल. तथापि, उपरोक्त उद्योगांच्या प्रस्तावित ठिकाणाची हवा व जल प्रदूषणाच्या दृष्टीने "धारण क्षमता अभ्यास" ( carrying capacity study) लक्षात घेऊन निर्णय घेण्यात यावा.

(४) खडी तयार करण्याच्या उद्योग घटकांनी (स्टोन क्रशर) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घ्यावी.

...२

) प्रकल्पांनी केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाच्या दि. १४-०९-२००६ रोजीच्या अधिसूचनेनुसार यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांनुसार शासनाची पूर्व-पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक असेल. तसेच शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांची पूर्तता करणे बंधनकारक असेल.

हा शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग तसेच सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( ग. नि. वराडे )
शासनाचे संचालक

प्रत :
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
मा. राज्य मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
अपर मुख्य सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग - २ व १८)
सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
सचिव, पर्यावरण, यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई
विशेष भूसंपादन अधिकारी (सर्व)
उप विभागीय अधिकारी, सावंतवाडी / कणकवली
तहसिलदार (सर्व)
उपवन संरक्षक, सावंतवाडी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली / सावंतवाडी
पर्यटन अधिकारी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, सिंधुदुर्ग
नगररचनाकार, सिंधुदुर्ग
कार्यकारी अधिकारी, लघुपाटबंधारे, सिंधुदुर्ग
पर्यावरण विभाग, संबंधित कार्यासने.
निवड नस्ती.

- - - - - -